# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.04.2026** **वारः सोमवार**

---

1. चार राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणूकीची रणधुमाळी
2. पश्चिमबंगाल आणि आसाममध्ये विविध पक्षांच्या नेत्यांच्या प्रचारसभा
3. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारतीय जहाजांचा सुरक्षित प्रवास
4. होर्मुझची सामुद्रधुनी उद्यापर्यंत खुली न केल्यास कडक कारवाईचा इराणला ट्रंप यांचा इशारा आणि
5. आंतर विद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धांना सांगलीमध्ये तर सातव्या राष्ट्रीय कनिष्ठ मुष्टियुद्ध स्पर्धेला नागपूरमध्ये आरंभ

**निवडणूक-पंतप्रधान**

चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकांसाठीचा प्रचार शिगेला पोहोचला असून, मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रमुख नेते या राज्यांचा दौरा करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भवानीपूर-सोरभोग, होजाई आणि दिब्रुगड इथं प्रचारासाठी आसामच्या दौऱ्यावर जाणार आहेत. पश्चिम बंगालमध्ये आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी राज्यभर जनसंपर्क मोहीम राबवली असून प्रचार शिगेला पोहोचला आहे. राज्यात दोन टप्प्यांत होणारे मतदान या महिन्याच्या 23 आणि 29 तारखेला पार पडणार आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल उत्तर बंगालमधील कूचबिहार जिल्ह्यात जनसभेला संबोधित केलं. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा अभाव असल्याचं सांगत गैरव्यवहाराबाबत सत्ताधारी तृणमूल काँग्रेस सरकारवर जोरदार टीका केली. तसेच, मालदा जिल्ह्यात न्यायालयातील अधिकाऱ्यांना अनेक तास ओलीस ठेवल्याप्रकरणी राज्य सरकारवर ताशेरे ओढले. 'महिला आरक्षण विधेयका'च्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी, केंद्र सरकारने या महिन्याच्या 16, 17 आणि 18 तारखांना संसदेचं विशेष अधिवेशन बोलावल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. संसदेमध्ये महिलांची भूमिका बळकट करण्यासोबतच, राज्यांना व्यापक लाभ मिळवून देणे हे सरकारचे उद्दिष्ट असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं.

पश्चिम बंगालमध्ये भाजपा सत्तेवर आल्यास, औद्योगिकीकरण, शेतकऱ्यांचे उत्पन्न, महिलांची सुरक्षा आणि रोजगार या बाबींना प्राधान्य दिले जाईल. असं आश्वासन त्यांनी दिलं. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी काल पश्चिम बंगालच्या विविध भागांमध्ये जाहीर सभांना संबोधित केलं. त्यांनी समशेरगंज, जियागंज आणि अजिमगंज इथं सभा घेतल्या, तसेच मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बहरामपूर शहरात आयोजित एका पथफेरीमध्ये सहभाग घेतला.

**आसाम**

आसाममध्ये निवडणुकीचा प्रचार तीव्र झाला असून, भाजप आणि काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी राज्यभरात विविध ठिकाणी काल सभांना संबोधित केलं. राज्यात येत्या गुरुवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते सर्वानंद सोनोवाल यांनी धेमाजी इथं काल एका जाहीर सभेला संबोधित केलं. काँग्रेस, डावी आघाडी आणि इतर

राजकीय पक्ष राज्यभरात विविध ठिकाणी जाहीर सभांच्या माध्यमातून प्रचार करत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काल आसाममधील विश्वनाथ आणि गोलाघाट इथं सभा घेतल्या.

दरम्यान, महाराष्ट्रातील विधानसभेच्या दोन जागांसाठी येत्या 23 एप्रिलला मतदान आणि चार मे रोजी मतमोजणी होणार आहे. बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानं या दोन्ही जागा रिक्त झाल्या आहेत. काँग्रेस पक्षाने काल बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आकाश मोरे यांची उमेदवार म्हणून घोषणा केली. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज उमेदवारी अर्ज भरणार आहेत. दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघात, भारतीय जनता पक्षाने दिवंगत शिवाजी कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले यांची निवडणुकीसाठी आपला अधिकृत उमेदवार म्हणून घोषणा केली आहे.

**<u>इराण-ओमान</u>**

पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षामुळे महत्त्वाचा जागतिक सागरी मार्ग असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी सागरी वाहतूक सुलभ करण्यासंदर्भात ओमान आणि इराणने काल चर्चा केली. इराणने जहाजांच्या हालचालींचे नियमन करण्यासाठी ओमानसोबत युद्धोत्तर सागरी कराराचा प्रस्तावही दिला आहे, तर इराणच्या एका संसदीय समितीने अलीकडेच टोल आकारण्याच्या आणि अमेरिकन आणि इस्रायली जहाजांवर बंदी घालण्याच्या पर्यायाबाबत आपण सकारात्मक असल्याचं म्हटलं आहे.

दरम्यान, भारतीय ध्वज असलेल्या 'ग्रीन आशा' या एलपीजी टँकरने इराणजवळची होर्मुझची सामुद्रधुनी यशस्वीरित्या काल पार केली आहे. आखाती प्रदेशात तणाव वाढल्यापासून या जलमार्गातून प्रवास करणारे हे नववं भारतीय जहाज आहे. आतापर्यंत भारतीय जहाजांनी एकत्रितपणे 92 हजार टनांहून अधिक एलपीजीची वाहतूक या मार्गातून केली आहे. तर 'जग लाडकी' आणि 'जग प्रकाश' या तेल टँकर्सनी संयुक्त अरब अमिराती आणि ओमानमधून कच्चे तेल आणि गॅसोलीनची वाहतूक केली.

**<u>ट्रंप</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, होर्मुझची सामुद्रधुनी सर्व प्रकारच्या जल वाहतुकीसाठी पुन्हा खुली करण्यासाठी इराणला उद्यापर्यंत मुदत दिली आहे. ही मागणी मान्य न केल्यास इराणचे वीज प्रकल्प आणि पूल अशा सुविधांवर जोरदार हल्ला केला जाईल असा इशारा दिला आहे. यासंदर्भात इराणसोबत करार होण्याची शक्यता असल्याचं त्यांनी अमेरिकेतील माध्यमांशी बोलताना सांगितलं. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेल वाहतूक थांबवल्याने जागतिक तेलाच्या किमतींत वाढ झाली असून जगभरात महागाई वाढण्याची भीती निर्माण झाली आहे.

दरम्यान, OPEC देशांनी काल दुरस्थ माध्यमातून बैठक घेतली आणि मे महिन्यापासून दररोज 2 लाख 6 हजार बॅरल्सनं तेलाचे उत्पादन वाढवण्यावर या समुहातील देशांनी सहमती दर्शवली आहे. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक बाजारपेठा स्थिर करणे, हा या निर्णयाचा उद्देश आहे.

**<u>जयशंकर</u>**

पश्चिम आशिया संघर्षाच्या पार्शावभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस.जयशंकर यांनी काल इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अरागची आणि कतारचे पंतप्रधान शेख मोहम्मद बिन अब्दुल रहमान बिन जस्सिम अल थानी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. डॉ. जयशंकर यांनी संयुक्त अरब अमिरातीचे परराष्ट्र मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाह्यान यांच्याशीही दूरध्वनीवरून चर्चा केली. या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर झालेला परिणाम या मुद्द्यावर

प्रामुख्यानं संभाषणात चर्चा झाल्याचं समजतं. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ल्याचा पुन्हा एकदा इशारा दिल्यानं तणाव आणखी वाढला आहे, या पार्श्र्वभूमीवर जयशंकर यांनी या तीन पश्चिम आशियाई देशांच्या नेत्यांशी दूरध्वनीवरून ही चर्चा केली.

**<u>5 किलो-LPG</u>**

केंद्र सरकारनं 5-किलो वजनाच्या लहान LPG सिलिंडर्सच्या विक्रीत वाढ केली आहे; हे सिलिंडर्स LPG वितरक केंद्रांवर वैध ओळखपत्र दाखवून थेट खरेदीसाठी उपलब्ध आहेत. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, मागणी पूर्ण करण्यासाठी शासनाने पुरवठा वाढवल्यापासून, 23 मार्चनंतर आतापर्यंत 5-किलो वजनाच्या सुमारे 6 लाखांपेक्षा अधिक LPG सिलिंडर्सची विक्री झाली आहे. 4 एप्रिल रोजी 51 लाखांहून अधिक घरगुती सिलिंडर्सचे वितरण करण्यात आले असून, ही संख्या एकूण मागणी पैकी 95 टक्के मागणी ही ऑनलाइन बुकिंगद्वारे नोंदवली गेली आहे. असं मंत्रालयानं काल सांगितलं.

**<u>एअर इंडिया-इस्रायल</u>**

पश्चिम आशियामधील सध्याच्या संघर्षग्रस्त वातावरणामुळे एअर इंडियानं आपली इस्रायलमधील विमान उड्डाणं सध्या स्थगित केली आहेत. कंपनीनं आपली नवी दिल्ली -तेल अव्हिव या मार्गावरील उड्डाणं येत्या 31 मे पर्यंत रद्द केली असल्याचं, एअर इंडियाच्या अधिकाऱ्यानं सांगितलं. इतर बहुतांश प्रमुख विमान कंपन्यांनीही तेल अव्हिव मार्गावरची उड्डाणं सध्या थांबवली आहेत. सध्या केवळ इस्रायली विमान कंपन्या अत्यंत कडक बंधनं पाळून विमानसेवा देत आहेत. ही विमान उड्डाणं रद्द झाल्यानं व्यावसायिक अथवा वैयक्तिक कारणास्तव भारतात येऊ इच्छिणाऱ्या इस्रायलमध्ये राहत असलेल्या 40 हजार भारतीयांसाठी चिंतेची बाब बनली आहे.

**<u>नौकानयन-सांगली</u>**

महाराष्ट्रात सांगली इथं अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग या नौकानयन स्पर्धांचं उद्घाटन सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते काल करण्यात आलं. भारतीय विद्यापीठे महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ यांनी संयुक्तपणे याचं आयोजन केलं आहे. या नौकानयन स्पर्धेत देशभरातील 40 विद्यापीठांमधून 685 पुरुष आणि महिला खेळाडू सहभागी झाले आहेत.

**<u>राष्ट्रीय बॉक्सिंग-नागपूर</u>**

नागपूरमध्ये 17 वर्षांखालील मुला-मुलींची 7 वी राष्ट्रीय कनिष्ठ मुष्टियुद्ध स्पर्धेचं उद्घाटन काल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालं. या स्पर्धेत देशभरातून सुमारे 600 युवा मुष्टियोद्धे सहभागी होत आहेत. ही स्पर्धा 48 किलो ते 85 किलो अशा एकंदर 13 वजन गटांमध्ये खेळवली जाणार आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची 17 वर्षांखालील भारतीय संघात निवड होऊन ते उझबेकिस्तानमधल्या ताश्कंद इथं होणाऱ्या आशियाई 17 वर्षांखालील मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत देशाचं प्रतिनिधित्व करतील.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार